Vol 6 Issue 6 July 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

# Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850


Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]

ISRJ Indian Streams Research Journal

# 1975 नंतरच्या मराठी कादंबरीतील कृषीजीवन

प्रा. सुलोचना बापूराव नरुटे
मु. वाघमोडेवाडी पो. गोंदवले बुद्रुक , ता. माण जि. सातारा.

**प्रास्ताविक**

ग्रामीण जीवनाचा मूळाधार शेती ही आहे. अश्मयुगानंतर मानवी संस्कृतीचा विकास होत गेला. तो निसर्गाच्या सहवासात राहत होता .त्यामुळे निसर्गात घडणाऱ्या बदलांमुळे मानवी संस्कृतीत बदल होत गेले. सुरुवातीच्या काळात तो समूहाने राहत असे पशूपक्ष्यांची शिकार करून आणि कंदमुळे यावर आपली उपजिविका करीत असे. जमिनीत पडलेल्या बिया पाऊसामुळे उगवून येतात. याची जाणीव स्त्रीला झाली असावी. त्यातून पाण्याच्या ठिकाणी शेती करण्यास सुरुवात केली. पुढे सर्व मानवाचे शेती हेच उपजिविकेचे केंद्र




बनले. ज्याठिकाणी पिकास योग्य जमीन आहे. त्यातून तो उत्पादन काढू लागला. त्यालाच त्याने 'काळी' असे नाव दिले. पिकास अयोग्य असणाऱ्या ठिकाणी वस्ती केली. त्याला त्याने 'पांढरी' असे नाव दिले. यातूनच 'गावगाडा' तयार झाला. ग्रामीणांच्या दृष्टीने शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शेती हेच मुख्य केंद्र आहे. औद्योगिकरणानंतर कृषिजीवनात बदल होत गेले आहेत. नव्या नव्या समस्या निर्माण होऊ लागल्या त्याचे वास्तवदर्शी चित्र 1975 नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत आलेले दिसते.

1975 नंतरच्या कादंबरीत कृषिजीवनाचे विविध पदर उलगडून दाखवले आहेत. भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही लोकसंख्येच्या साठ टक्के लोक खेड्यात राहतात. या लोकांच्या उपजीविकेचे एकमेव साधन म्हणजे शेती हे असते. अशा या शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाचे ग्रामीण कादंबरीत विविध पातळीवर अतिशय वास्तव असे चित्र रेखाटले आहे. यंत्रयुगाचा आणि जागतिकीकरणाचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम, वारंवार पडणारा दुष्काळ, सुशिक्षित तरुणांचे वाढते बेकारीचे प्रमाण, वाढता भ्रष्टाचार त्याचे शेतकरी जीवनावर होणारे परिणाम, शेतकऱ्याच्या उत्पादनाला हमी भावाविषयी कोणतेही धोरण नसल्यामुळे सतत कर्जबाजारी होणारा शेतकरी, त्यातून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, शासनाच्या नवीन योजना, धरणग्रस्तांची ससेहोलपट, त्यांच्यावर शासकीय अधिकाऱ्याकडून होणारे अन्याय, पुनर्वसनातून, शेतकऱ्यांकडून होणारा छळ, शिक्षण प्रसारामुळे बदलते विचार, यामुळे जीवनात येणारे नैराश्य अशा अनेक घटकातून उद्ध्वस्त होत असलेले कृषिजीवन प्रत्ययाला येताना दिसते. सामान्य शेतकऱ्याच्या दुःखाची कारणे कोणती? त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची पार्श्वभूमी कोणती?कृषिकेंद्री शेतकरी आला आहे का? नव–नवीन वाणाचा शेतकरी जीवनावर परिणाम कसा चित्रित केला आहे? या प्रश्नांची मुळं 1975 नंतरच्या कादंबरीत कशी अभिव्यक्त झाली आहेत? कृषिजीवनाचे वास्तव अधोरेखित करताना प्रक्षोभक वर्णन कसे आले आहे? 1975 नंतरचा हा कालपट तसा मोठा आहे. या कालखंडात कादंबरीची रचना विपुल प्रमाणत झालेली आहे. 'विषवृक्षाच्या मुळ्या' झाडाझडती, पांगिरा, बारोमास, रिक्त अतिरिक्त, सेझ, चाळेगत, या कादंबऱ्यांतून कृषीजीवनाचा वेध घेतला आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या कृषिजीवनाचे चित्रण आले आहे. शेतकरी, त्यांच्या व्यथा, वेदना, त्यांचे दुःख, दारिद्र्य याला कारणीभूत कोण? नव्याने आलेल्या तंत्रज्ञानाचा शेतकरी जीवनावर कसा झालेला परिणाम, नव्याने आलेल्या तंत्रातून शेतकरी समृध्द आणि समाधानी आहे का? अशा अनेक प्रश्नांचा समस्यांचा शोध घेणे गरजेचे आहे. हा शोध काही मुद्यांच्या आधारे घेतला तर अधिक सुसंगतपणे मांडता येईल.

### शेतकऱ्यांच्या जीवनाची शोकांतिका

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांची 2002मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी. यामध्ये शेतकरी बारा महिने दारिद्‌यात, दुःखात आणि अनेक विवंचनेत जगत असतात. याचा खोलवर जावून वेध घेतला आहे. एकनाथचा मेहुना रावसाहेब याला सावकार जबरदस्तीने कर्जात कायमची जमीन मारहाण करून घेण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी अगतीक होऊन गळफास लावून आत्महत्या करतो. एकनाथचे वडील मुलाला नोकरी लागावी म्हणून दगड्या सावकाराकडून जमीनवर कर्ज काढतात. मुलाला फसविले जाते. आता आपली जमीन सावकाराच्या घशात जाणार या समस्येने बेचैन होऊन कीटक नाशक पिऊन स्वतःला संपविण्याचा प्रयत्न करतात. एकनाथ सुशिक्षित आहे. परंतु नोकरी नसल्यामुळे तो इमानेइतबारे शेतीत कष्ट करतो. परंतु बायको शहरी वातावरणात वाढलेली असल्यामुळे ग्रामीण भागात आणि दारिद्र्यात जीवन जगू इच्छित नाही. ती कायमची माहेरी निघून जाते. मधुला नोकरी नसल्यामुळे त्याचे लग्न ठरत नाही. एकंदर पूर्ण कुटुंबाची शोकांतिका होते. रावसाहेब, सुभानराव आणि एकनाथ यांना शेतीविषयी आस्था आणि कृतज्ञता आहे. मात्र मधु आणि अलका यांना शेतीविषयी प्रेम नाही. निष्ठा नाही. शेतीला ते नरकवास समजतात. मधु आणि अलका ही आजच्या पिढीची प्रतिनिधी आहेत. मधु शेती करण्याऐवजी सोनेरी टोळी करून गुप्तधनाच्या शोधा पाठीमागे लागतो. शेतीविषयी सतत अनास्था व्यक्त करतो. गुप्तधनाच्या पाठीमागे लागून व्यसनाकडे वळतो. तर अलका जमीन विकून शहरात दुकान टाकण्याचा विचार करते. त्यामध्ये ती यशस्वी होत नाही. म्हणून ती कायमची माहेरी निघून जाते. एकनाथ मात्र धीरगंभीरपणे येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जातो.

'रिक्त–अतिरिक्त' ही रा. रं. बोराडे यांची 2009 मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी. यामध्ये कृषीजीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. जगात भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळख असलेला देश आहे. शेती हे शेतकऱ्याचे मुख्य साधन आहे. परंतु याच शेतीला ग्रहण लागलेले दिसते. 'रिक्त–अतिरिक्त'मधील नाथाप्पा अहोरात्र शेतीत काबडकष्ट करतात. शेतात ऊस जोमाने आणतात. पण ऐनवेळी ऊस उत्पादन कारखान्याच्या गाळप क्षमतेपेक्षा जास्त झाले आहे. म्हणून कारखाना बंद केला जातो. याला जबाबदार कोण? असा प्रश्न पडतो. याचा बारकाईने विचार केला तर आपली व्यवस्थापन व्यवस्था जबाबदार म्हणावी लागेल. व्यवस्थापन चांगले असेल तर कोणावर अन्याय होणार नाही. याला विरोध कोणी कसा करायचा हेच भयंकर कठीण आहे. कारण शेतकरी संघटित होऊ शकत नाही. संपूर्ण देशभर शेतकरी आहे. एकत्र येणे कठीण आहे. याशिवाय समाजात अनेक प्रवृत्तीची माणसं असल्यामुळे हे सर्वजण एकत्र येणे अशक्य आहे. यामध्ये स्वार्थी, श्रीमंत, गुंड, दहशतवादी, भ्रष्टाचारी, सत्ताधीश, भांडवालदार आणि सर्वसामान्य जीवन जगणारा शेतकरी यांचा समावेश आहे. प्रत्येकजण स्वतःच्या फायद्याचा विचार करताना दिसतो. यातच सर्वसामान्य आणि दारिद्र्यात जीवन जगणारा शेतकरी शोषला जातो. तो भोवऱ्याप्रमाणे अनेक गर्तेत सापडतो. आणि शेवटी नाइलाजाने मरण जवळ करतो.

नाथाप्पा शेतात ऊस चांगला आणतात. त्यावर त्यांनी अनेक स्वप्ने उराशी बाळगलेली असतात. पण त्यांना न्याय मिळत नाही. ते उद्याच्या चिंतेने, झालेल्या खर्चाने बेभान होतात. आणि ऊस पेटवून ऊसाबरोबर आपला अंत करून घेतात आत्महत्या करतात. ती स्वप्ने एका क्षणात नाहीशी होतात. कारखानदार नियम बाजूला ठेवून श्रीमंत शेतकऱ्यांचा ऊस तोडतात. याचाच अर्थ हे नियम फक्त सर्वसामान्यासाठी असतात. आज समाजात शेतकऱ्यांना शोषणाऱ्या शोषकाची विपुलप्रमाणात पैदास झाली आहे. यातून सर्वसामान्य शेतकरी धोक्यात येत आहे. उद्ध्वस्त होत आहे, देशोधडीला लागत आहे. याचे अतिशय संवेदनशील, सर्जनशील, सहानुभूतीपूर्वक आणि सूक्ष्मपणे 1975 नंतरची कादंबरी वेध घेताना दिसते. शेतकऱ्यांच्या जीवनाची रक्तबंबाळ काहाणी प्रकट करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

### सहकार क्षेत्राचा षेतकरी जीवनावर परिणाम

देशाचा विकास व्हावा. तो विकसनशील झाला पाहिजे. यासाठी सतत प्रयत्न केले जातात. त्यामुळे सतत बदल होताना दिसतो. परिवर्तनशीलता हा अत्यंत महत्त्वाचा विशेष आहे. कोणतेही बदल एका क्षणात कधीच होत नाही. सहकार क्षेत्राच्या पाठीमागे निश्चित अशी भूमिका आहे. त्याला खूप वर्षाचा संदर्भ आणि इतिहास आहे. आपल्याला माहित आहे. म. फुले यांनी सावकार व्यवस्थेवर कडाडून प्रहार केले आहेत. सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्ती व्हावी म्हणून शेतकऱ्यांसाठी काही उपाय केले पाहिजेत. अशी त्यांनी इंग्रज सत्ताधीशांकडे मागणी केली. त्यानंतर त्यांनी तलावाच्या आणि धरणाच्या माध्यमातून काही उपाययोजना राबविल्या. त्याचे पुरावे आजही उपलब्ध आहेत. हा स्त्रोत पकडून आज शेतकऱ्यांसाठी नव्याने सहकार क्षेत्राचा उदय झाला असावा. शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारावे शेतकरी सावकाराच्या पाशातून मुक्त व्हावा. या हेतूने शासकीय पातळीवर नव्या नव्या सहकार संस्था उदयास आल्या. यातून शेतकऱ्यांमध्ये सुधारणा झाली का? त्यांचे जीवनमान उंचावले का? कर्जमुक्त शेतकरी आहे का? सावकारशाही नष्ट झाली का? या प्रश्नांची उकल वासदेव मुलाटे यांच्या 'विषवृक्षाच्या मुळ्या'1989 मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीत केलेली आहे. या कादंबरी संदर्भात रवींद्र ठाकूर लिहितात ''आज हा सहकाराचा वृक्ष अमृतवृक्ष राहिला नसून तो विषवृक्ष बनला आहे आणि त्याच्या मुळ्या समाजजीवनाला उत्तरोत्तर कशा पोखरत निघाल्या आहेत याचा प्रत्यय ही कादंबरी घडवते''[1] हे मत अगदी समर्पक आहे. कारण आज सर्वत्र भ्रष्टाचाराचे साम्राज्य पसरले आहे. हा भ्रष्टाचार शेतकऱ्याला विषारी अजगराप्रमाणे दंश करून नष्ट करीत आहे. म्हणूनच लेखकाने विश्वास तरटे हा शिक्षकी पेशा असलेला पण पुढे सहकार क्षेत्रात रूजू झालेला दाखविला असावा. पण त्याचा पिंड शिक्षकी असल्यामुळे तो अस्वस्थ होतो. शिक्षकी पेशा सोडून बॅंकेत नोकरीस आलेला विश्वनाथ तरटे तेथील भ्रष्टाचार, नात्यागोत्याचे राजकारण, वसुली अधिकारी आणि सावकार यांचे लागेबांधे पाहून अस्वस्थ होतो. शेवटी हा सहकार आहे तरी कोणसाठी हा प्रश्न त्याला पडतो. खरे सावकाराच्या विळख्यातून मुक्त होण्यासाठी सहकार बॅंकाची निर्मिती केली आहे. परंतु प्रत्यक्षात कर्जाचे चेक सावकारकडे जातात. सावकार आपला हिस्सा घेऊन अधिकाऱ्याला कमिशन देऊन बाकीची रक्कम शेतकऱ्याला देतो. हे सर्व पाहून विश्वनाथ अस्वस्थ होतो. आपण हे बदलू शकत नाही. आपण प्रामाणिकपणे काम करायचे म्हटले तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. या सर्व गोष्टीने तो बेचैन होतो. एंकदर भीषण भ्रष्टाचाराचे वास्तव चित्र अधोरेखित केले आहे. यातून शेतकरी अधिक उदध्वस्त होत चालल्याचे चित्र उभे केले आहे. नव्या रूपात सावकारशाही सशक्त होताना दिसते.

सहकारी क्षेत्र म्हणजे राजकारणात वर जाण्याची शिडी. बॅंकेची बैठक होती. त्या बैठकीत चेअरमन, डायरेक्टर यांनी बॅंकेच्या संदर्भात चर्चा करण्याऐवजी ते निवडणुका संदर्भात चर्चा करतात. तसेच बॅंक अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या प्रचाराचे आदेश देतात. जनमत आपल्याच बाजूने झाले पाहिजे. हे सहकार क्षेत्र शेतकऱ्यांच्या कल्याणाऐवजी पुढारी राजकारणी मंडळी आपला स्वार्थ साधून घेतात.

सोसायटी अंतर्गत सामान्य माणसासाठी असलेल्या स्वस्थ धान्याचा पुरवठा सामान्यांपर्यंत पोहचत नाही. तो गावापर्यंत येत नाही. दुप्पट किंमतीने विकला जातो. एखाद्याने तक्रार किंवा मागणी केली तर न्याय मिळत नाही. यामुळे शेतकरी, शेत मजुर यांचे शोषण केले जाते. कापूस केंद्रातील भ्रष्टाचार कसा चालतो. याचे अदृश्य रूप उलगडून दाखविले आहे. अधिकारी मंडळी केंद्रावर न घातलेल्या कापसाची नोंद करतात. कागदोपत्री रेकॉर्ड तयार करतात. आणि थोड्याशा कापसाला आग लावतात. शेतकऱ्याच्या नावाखाली हे अधिकारी पैसे कमवतात. काही वेळा चांगल्या प्रतिचा कापूस घ्यायचा कमी प्रतिचा भाव शेतकऱ्याला सांगायचा. पण थोडेसे पैसे ज्यादा द्यायचे त्यामुळे शेतकरी पावतीची मागणी करत नाही. अशा अनेक प्रकारे शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे आणि शासनाचे शोषण केले जाते. एके काळी देशासाठी सर्वस्व पणाला लावून काम करणाऱ्या नेत्यांचा वारसा या देशाला होता. देशाविषयी निष्ठा आणि आस्था होती. आज मात्र भ्रष्टाचारी वृत्तीमुळे माणूस नैतिकता. मूलभूत असणारी मूल्य नष्ट करू पाहत आहे.

विश्वास पाटील हे मराठी वाङमयातील एक अग्रगण्य असलेले लेखक आहेत. त्यांची 'झाडाझडती'1991 मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी. यामध्ये धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनाचा वेध घेतला आहे. आधुनिक काळात वेगवेगळ्या योजना येतात. प्रगतीच्या दृष्टीने प्रकल्प राबविले जातात. पण त्यात सर्वसामान्य शेतकरी भरडला जातो. अशा धरणप्रकल्पाची, त्यातील धरणग्रस्तांची एक एक कथा प्रकट केली आहे. यामध्ये धरणग्रस्तांच्या जीवनाची चित्तरकथा व्यक्त झाली आहे. या धरणग्रस्तांना अतिशय खडतर प्रवास करावा लागतो. बाबुराव शिंगाडे हे खैरापूरचे. खैरापूर हे दुष्काळी गाव. शिंगाडे यांची दोनशे एकर जमीन यासाठी ते धरणप्रकल्प उभा करतात. त्यासाठी 'जांभळी' गाव केंद्र करतात. या धरणाला गावकरी विरोध करतात. पण शिंगाडे हे खासदार असल्याने राजकीय दबावातून धरणप्रकल्प पूर्ण करतात. खरे तर जांभळीकरांना ते शब्द देतात. तुम्हांला वाऱ्यावर सोडणार नाही. खणाला खण आणि फणाला फण देणार. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या वाट्याला एवढे खडतर जीवन आले आहे. त्याचे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे.

या धरणामध्ये गावेच्या गावे गाडली जातात. त्यांची हजारो वर्षे चालत आलेली संस्कृती एका क्षणात नष्ट होते. ते बेघर आणि भूमिहीन झाल्यानंतर सरकार देईल त्या ठिकाणी मिळेल ती जागा आणि जमीन घेऊन राहतात. त्यांचे गाव, त्या गावातील त्यांचे संबंध, त्यांची गावातील प्रतिष्ठा, त्यांचे देव या साऱ्या गोष्टी काही क्षणात नष्ट होतात. त्यांचे जीवन उपरे ठरते. जगण्यसाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो. अनेक वेळा अपमानित व्हावे लागते. आपली प्रतिष्ठा, स्वाभिमान बाजूला ठेवून लाचारीचे जगणे वाट्याला येते. न्याय हक्कासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो. या धरणग्रस्तांना आयुष्यभर दुःख, वेदना व्यथा वाट्याला आलेल्या आहेत. त्यांचे ठिकठिकाणी शोषण केले जाते.

धरणग्रस्तांचे अनेक प्रकारे शोषण केले जाते. पुनर्वसन करण्यासाठी शासन दरबारी आंदोलन, संघर्ष केला तरी भ्रष्ट अधिकारी त्यांना न्याय देत नाही. हैबती धरणग्रस्त म्हणून नोकरीमध्ये कायम करून घेतील या अपेक्षेने आई—पत्नीला गावी ठेवून धरणाचे काम करतो. पण अखेरपर्यंत त्याला कायमस्वरूपी केले जात नाही. शेवटी राघू भिवा त्याचा ठेचून मारून खून करतात. धरणग्रस्तांना मिळालेल्या जमीनीत कष्ट करून जगू दिले जात नाही. त्यासाठी त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय केला जातो. त्यांना मिळणाऱ्या सोयी, सवलती भ्रष्ट अधिकारी आणि स्वार्थी राजकारणी मंडळी मिळू देत नाहीत. त्यामुळे त्यांचे दुःख अधिक तीव्र आणि दाहक बनत जाते.

धरणग्रस्तांना शासन दरबारी न्याय मिळतच नाही. धरणाचा सर्वे केल्यानंतर त्यांच्या जमीनीच्या घराच्या किंमती ठरवतात. पण त्याची तातडीने कार्यवाही करत नाहीत. कित्येक वर्षानी कार्यवाही केली जाते. तोपर्यत मिळणाऱ्या जमीनीची किंमत चौपट झालेली असते. मग ती किंमत शेतकऱ्यांना देणे अशक्य होते. अशावेळी शेतकरी भूमिहीन होतो किंवा अल्प भूमी घेऊन राहवे लागते. घरबांधणीची अवस्था अशीच आहे. दत्तू करवंदे तलाट्याला जिवंत असलेल्या सावत्र आईच्या मृत्यूचा दाखला देऊन तिची जमीन हडप करतो. स्वतःचा स्वार्थ साधून घेतो. धरणग्रस्तांना विरोध करतो. चांगल्या जमीनीचे डाग स्वतःसाठी घेतो. वाघेठान आणि आंबेपूरला घर बांधतो. खैरापूरलाही त्याने तीन गुंठे जागा घेतली आहे. त्याच्या वखारी आहेत. लाला जाधवही खैरापूरला नदीकाठी चाळीस एकर जमीन घेतो. जांभळी गावातले धनदांडगेच पहिल्यांदा आपला स्वार्थ साधून घेतात. अशा अनेक समस्यांनी धरणग्रस्त हैराण होतात.

बलुतेदारांना बेवारस व्हावे लागते. कोळ्याचा गोम्या हल्यावरून पखालीने गावातील लोकांचे रांजण भरीत होता. नव्या वसाहतीत त्याच्या हल्याला कामच मिळत नाही. त्याला जांभळीत जो भाकर तुकडा मिळत होता, तो आता इथे मिळत नाही. इथे प्रत्येकाला जगणेच कठीण झाले आहे. प्रत्येकाची अवस्था भुकेकंगाल होऊन बसली आहे. जो सतत पडेल तो कामधंदा करेल तोच जगण्यालायक ठरतो. गोम्या कामधंदा सोडून हल्याच्या भोवतीने फिरत असतो. आता हल्याचे जगणेच येथे निरर्थक ठरते. गोम्याच्या जगण्यालाही अर्थ उरत नाही. त्याची बायको एकटीच कामधंदा करण्यासाठी धडपडते, तिच्यावर प्रपंचाची जबाबदारी पडते. त्यामुळे गोम्यावर ती वैतागते. हल्याला विकायला सांगते. इथले जगणेच व्यवहारी बनून जाते. जांभळी गावचा दिगूअण्णा काळूबाईचा भक्त काळूबाई वाचवेल या वेड्या आशेवर घर सोडत नाही. पण धरणाचे पाणी घरात येते तेव्हा गावकरी त्याला वाचवतात. तो शहरात मुलाकडे राहयला जातो. पण शहरी वातावरणात त्याला जमत नाही. तो परत येतो धरणग्रस्तांचे हाल पाहून पुन्हा पुण्याला जातो.

जांभळी गाव धरणाखाली जाते. जांभळीकरांचा संसार उघड्यावर पडला असताना शासनाने वाहतुकीसाठी दिलेले वाहन सर्वसामान्यांच्या वाट्याला येऊ दिले जात नाही. जे गावातील पुढारी सरपंच, श्रीमंत आहेत. यांच्यासाठी वाहनांचा वापर केला जातो. पुनर्वसन झाल्यानंतरही या लोकांना सुखाने जगू दिले जात नाही. त्यांनी पडीक पडलेल्या जमीनी अहोरात्र कष्ट करून पीक आणले; तर त्या पिकात मुळचे लोक जनावरे सोडून पिकाची नासधूस करतात. विरोध करताच मारहाण करतात. त्यांची लहानसान जनावरे मारतात. इथे बाप भिक मागू देईना आणि आई पोट भरू देईना अशी कात्रीत सापडल्याप्रमाणे अवस्था होते.

या धरणग्रस्तांचा नेता म्हणजे वसंत खैरमोडे गुरूजी. ते सतत धरण्ग्रस्तांच्या पाठीशी असतात. नव्हे त्यांनी आयुष्यभर धरणग्रस्तांसाठी संघर्ष केला. त्यांना तुरुंगात जावे लागते. नोकरीतून निलंबित केले जाते. एकुलती एक असलेली मुलगी पण तिचे एका बिजवराशी लग्न लावण्याची वेळ येते. मुलीचा सासर तुटल्यानंतर मजुरी करण्याची वेळ तिच्यावर येते. पुनर्वसन झालेल्या ठिकाणचे तरुण दंडेलेशाहीने तिच्यावर अत्याचार करतात. आंधाऱ्या रात्री गुरूजींना बेदम मारतात. असे एक ना अनेक प्रकारे अन्याय अत्याचार केले जातात. या विस्थापितांना जगणे असह्य होऊन बसते.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकार क्षेत्रात वाढ झाली. या क्षेत्रात शिरलेल्या भ्रष्टाचाराने सगळे जीवनच नासवून टाकले. किंबहुना सर्व पाताळ्यांवरचा भ्रष्टाचार सामाजिकतेचा विशेष आहे. सहकाराच्या निमित्ताने काही प्रश्न निश्चितपणे उभे राहतात. साखर

कारखान्याची, ग्रामीणांचे जीवन उंचावेल. त्यांना नगदी पिंकावर विकास करता येईल. पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. याचे वास्तव चित्र काही लेखकांनी आपल्या कादंबऱ्यातून रेखाटले आहे. 'शिदोरी' साखर पेरणी' आणि रिक्तअतिरिक्त' यातून आले आहे. शेतकरी जीवनातील अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

शेतकऱ्याचे जीवन फुलते, बहरते ते 'काळ्या' आईच्या कुशीत तीच त्याची संपत्ती, जीवनदात्री असते. शेती आणि शेतकरी यांचा संबंध घनिष्ट असतो. शेतीशिवाय शेतकऱ्याला स्थान नसते. शेतकऱ्याची शेती ही केंद्रबिंदू असते. तिच्यावर त्याची निष्ठा आणि प्रेम असते. मातीच्या कणाकणाशी त्याचा जिव्हाळ्याचा संबंध असतो. तो आपल्या शेतात अहोरात्र कष्ट करून मोती पिकवतो. आणि सर्वांचा अन्नदाता होतो. आज मात्र शेतकऱ्याची स्थिती दयनीय होत असताना दिसते. याचे चित्रण आजच्या कादंबरीत येताना दिसते.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचे आणि दारिद्र्याचे चित्रण आपल्या साहित्यातून केले आहे. याचा विचार केला तर शेतकरी हा नेहमीच अर्धपोटी आणि दुःख वेदनेत जीवन जगणारा आहे. आता काळ बदलला आहे. शिक्षणाच्या सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञान हे खेड्यापाड्यापर्यंत आले असले. तरी त्यांच्या जीवनात फारसा फरक पडला आहे असे दिसत नाही. तो नेहमीच गुलामासारखे आणि दबावाखाली दहशतीचे जीवन जगत असताना दिसतो. 'रिक्त अतिरिक्त' या कादंबरीमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्याच्या जीवनाचे चित्र रेखाटले आहे. शेतकरी जीवनाचे, त्यांच्यात नव्याने निर्माण झालेल्या समस्यांचे वास्तव चित्रण केले आहे. त्यांची ही कादंबरी समस्याप्रधान आहे. शेतकरी लोकांचे जगणे आविष्कृत करताना त्यांच्या समस्या प्रश्न त्यातून आर्थिक आणि कौटुंबिक परिस्थितीने हतबल झालेल्या शेतकऱ्याचे जीवन या कादंबरीत आलेले दिसते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये ग्रामीण भागाचा विकास व्हावा म्हणून अनेक योजना राबविण्यात आल्या. परंतु त्यामुळे खेड्याचा विकास झाला नाही. या योजनांची अमंलबजावणी योग्य प्रकारे झाली नाही. त्यामुळे दुर्बल असणारा शेतकरी अतिदुर्बल कसा होत गेला हे सांगितले आहे. त्यातही विशेष म्हणजे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य लाभावे म्हणून महाराष्ट्रात साखर कारखाने सुरू केले. परंतु या कारखानदारांनी मात्र ऊसाचे उत्पादन गाळपक्षमतेपेक्षा कमी तसेच जास्त झाल्या नंतरही शेतकऱ्यांना आपल्या दंडेलेशाहीने आर्थिकदृष्ट्या रिक्त केले. आर्थिकदृष्ट्या रिक्त झालेल्या, अनेक अडचणींना तोंड देत दुःखाने होरपळून निघालेल्या एका शेतकऱ्याच्या जीवनाची दर्दभरी कहाणी रेखाटली आहे. .

आज राजकरणकडे आकर्षित झालेल शेतकरी आणि तरुण दिसतो आहे. निवडणुकांच्या प्रचाराच्या हंगामात होत असलं तर अगोदर निवडणूक प्रचाराचा हंगाम का मारू नये? या विचारानं ज्यांना झपाटलं'' इथे लेखकांने ज्वलंत वास्तव टिपले आहे. हे या कादंबरीला वेगळपण प्राप्त करून देणारे आहे. असे ज्वलंत विचार क्वचित येताना दिसतात. कोणतेही कष्ट न करता चैनीविलासी जीवन जगण्याकडे या पिढीचा कल दिसतो. तो भविष्याचा कोणताही विचार करीत नाही. निवडणुकीसाठी कोणतेही मार्ग अवलंबिले जातात. त्यातूनच ढाबा संस्कृती वाढलेली दिसते. या ढाबा संस्कृतीत तरुण व्यसनाधिन होत आहे. कुटुंब आई बहिण मुलं यांच्याविषयी आस्था राहिली नाही. माणूस माणसापासून दुरावत चालल्याचे चित्र आज प्रखरतेने जाणवते. आज खऱ्या अर्थाने संतांच्या विचाराची गरज आहे. ग्रामीण समाजाला या विळख्यातून सोडविण्यसाठी संतांच्या विचाराची वाट चोखाळली पाहिजे. ज्ञानेश्वरांनी गीतेवर भाष्य करताना ज्ञानात्मक कर्माचे विवेचन केले. ते समाजात आजही रूजायला हवे. त्यातून तात्कालिक सुख नव्हे तर चिरकालपर्यंत सुख प्राप्त होईल. तरच उदयाचा शेतकरी समाधानी होऊ शकेल. दे रे हरी खाटल्यावरी म्हणण्याचा काळ नाही. आजचा समाज शेतावर काम करणे हलक्या दर्जाचे मानत आहे. हुशार बुध्दिमान असूनही काम करण्याच्या प्रवृत्तीचा अभाव असल्यामुळे दारिद्र्यात भर पडते. हेही दारिद्र्याचे कारण म्हणता येईल. कष्टावर विश्वास ठेवणे हे त्रिकाल सत्य माणसाने मानले पाहिजे. असे सूचित होताना दिसते.

शिक्षण हे केवळ नोकरीसाठी असते. याविषयीची समाजात चुकीची समजूत झालेली दिसते. शिक्षणातून स्वतःचा तर विकास व्हावाच. पण समाजालाही त्याची गोड फळे चाखायला मिळायला हवीत. आज समाजात सुशिक्षित बेकारांची संख्या जलद गतीने वाढत आहे. या सुशिक्षितांकडे समाजाने अवहेलेनेच्या नजरेने न पाहता त्यांचा अपमान न करता कष्टाविषयीचे संस्कार आणि शेतीविषयीचे महत्त्व मनामध्ये बिंबवण्याची गरज आहे. कोणतेही काम कनिष्ठ ,कमी दर्जाचे आहे हा समाजाच्या व सुशिक्षित तरुणाच्या मनातील न्यूनगंड कमी झाला तरच भारताची शेती प्रधान देश म्हणून प्रतिमा उंचावेल. कोणतेही शिक्षण काम करू नये असे कधीच सांगत नाही. हे समाजाच्या मनावर ठसले पाहिजे. नाथाप्पांचा केदार बी.ए.बी.एड होतो. नोकरी नसल्यामुळे नाथाप्पा म्हणतात ''ह्येला हाय का शेतापोताची फिकीर? ढुंगणावर ऊन आलं तरी ह्याचा अजूक उठायचा पत्ता न्हाई. शिकला तो इकला, म्हनतेत ते काय खोटं हाय का? समंद गाव कामाला लागलं की, मग हे म्हाराज सावकास उठतेत निचितीनं तोंड धुतेल आरामात च्या पेतेल. पोटभर हादडतेल आनं मंग बसनं तालुक्याला जातेल अगर गावभर बेल घालीत फिरतेल. काही म्हनायला गेलं तर शब्दानं शब्द वाढविनं आलचं'' त्यांच ना घरात ध्यान हाय ना शेताकडं ध्यान हाय. उठल्या सुटल्या तो मेघराजाकडं पळतो. त्यानं त्याला साळामास्तर करायचं गाजर दावलंय न्हवं. सिदराम तू काई म्हनं हे पोरगं आपल्या कामाला यील आसं काय वाटत न्हाई?'' त्याचा इचार सोडा आप्पा. त्याचं भलं झालं तरी आपल्याला पुरं आपल्या गावातलं. कोंचं शिकलेलं पोरगं आपल्या माय बापाच्या भावा भयनींच्या कामाला आलंय म्हनून हा आपल्या कामाला येनार हाय?'' आज सुशिक्षित तरुणांना समजून घेण्याची गरज अधिक आहे. अपमानकारक बोलण्याने नैराश्यतेशिवाय काहीच वाट्याला येणार नाही. उलट त्यांना मानसिक आधार देऊन त्याला काम करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. त्याच्यातील नैराश्यता आणि न्यूनगंड नाहीसा होऊन नव्याने विचार करून चांगले जीवन जगू शकेल नाही तर त्याचे भविष्य काळाच्या पडद्याआड व्हायला वेळ लागणार नाही. हे आजचे वास्तव आहे. अशा प्रकारचे जीवनातील वास्तव विषय साहित्यात आले नाहीत. असे विषय आले तर सुशिक्षितांना मानसिक आधार मिळून आपले जीवन सुकर करण्याचा प्रयत्न करतील.

शेतीवर शेतकऱ्याचे जिवापाड प्रेम असते. वाडवडिलांपासून आलेली शेती विकायची म्हटले तर त्याला ते कधीही सहन होत नाही. नाथाप्पांच्या वडिलांनी सात एकर कोरडवाहू शेती नाथाप्पांच्या स्वाधीन केली. त्यांनी अहोरात्र कष्ट करून, मेहनत करून विहिर खोदली, ऊस केला. असा हाडाचा शेतकरी राहिला नाही. या दृष्टीने सयाजीराव मोकाशीचे निरीक्षण महत्त्वाचे वाटते. ''निष्ठेने शेती करणे संपले. पूर्वीचे हाडाचे शेतकरी लयास गेले. नव्या तरुण पिढीला शेतीचे ज्ञान नाही. हल्ली पन्नास वर्षावरील शेतकरी पेरणी करताना दिसतो. नव्यामध्ये शेती करण्याची धमक आज दिसत नाही. शेतीत जगणे आज अवघड बनले असल्याने नवी पिढी शेतीकडे वळत नाही.''[2] याचा प्रत्यय 'रिक्त–अतिरिक्त'मध्ये केदारच्या व्यक्तिरेखेतून येतो. आज मात्र केदार हीच शेती विकायची म्हणतो आणि नोकरीसाठी पैसे भरायचे. त्यामुळे नाथाप्पा अधिकच उदास होतात. त्यांच्या मते आपल्या जगण्याला, राहण्याला काहीच अर्थ नाही. जन्मदाती आई आपल्याला काही काळ जगवू

Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

शकते. पण ही काळी मरणापर्यंत आपल्याला जगवते; नव्हे पिढ्यानपिढ्या तिच्यावर जगत असतात. पुष्ट होत असतात. तिलाच आपण विकायला लागलो. नियती सोडायला लागलो तर जगण्यात काय अर्थ त्यापेक्षा तिच्या कुशीत अंत झालेला बरा. या स्थितीचे वर्णन रा. रं बोराडे यांनी अतिशय उत्कट आणि मार्मिक शब्दात केले आहे. ''करनीसरा माझ्या काळजाचा तुकडा कापून इकायला तुला अेव्हडं शिकविलं व्हय रं, देवा रे, काय येळ आनलीस रं बाबा माज्यावर? ह्याला बऱ्या बोलानं रान इकायला परवानगी दिली न्हाई तर हा भांडण, आरडाओरडा करून सारं गाव जमा करील. आपल्या इज्जतीचा पंचनामा करील... पावन्या रावळ्यात नाचक्की करील.. देवा रं, सोडव रं बाबा ह्येतनं'' इथे एक टोक शेतीवर अनन्यसाधारण निष्ठा असणारे आहे. तर दुसरे टोक शेताविषयीची अनास्था व्यक्त करणारे आहे. भविष्यात भारत हा शेतीप्रधान देश आहे असे म्हणणे योग्य की अयोग्य हे येणारा काळच ठरवेल. कारण त्यांना ग्रामीण जीवनाविषयी प्रेम आणि ओढ नाही. शहरी जीवनाकडे कल आणि ओघ वाढत आहे. ही भारत देशापुढील गंभीर समस्या आहे. याचे वास्तव स्वरूप चित्रित केले आहे.

### *जागतिकीकरणाचा शेतकरी जीवनावर परिणाम*

जागतिकीकरण ही संकल्पना साधारणपणे 1991 मध्ये उदयास आली. ह्या जागतिकीकरणाचे दृश्य–अदृश्य परिणाम संपूर्ण जगावर झाले. त्यातल्या त्यात ग्रामीण सर्वसामान्य माणसावर आणि शेतकऱ्यांवर अधिक परिणाम झाला. हा झालेला परिणाम आणि बदल 1990 नंतरच्या ग्रामीण कादंबरीमधून मांडण्याचा प्रयत्न काही लेखकांनी केलेला आहे. ग्रामीण जीवनातला हा परिणाम भौतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व कृषिविषयक पातळीवरचा तर आहेच पण मानसिक पातळीवरचाही आहे.

शंकर सखाराम यांनी 'विशेष आर्थिक क्षेत्रावरील पहिली कादंबरी 'सेझ'2007 मध्ये लिहिली. ग्रामीण जीवनावर विपरीत परिणाम झाल्याचे चित्र यामध्ये पहावयास मिळत आहे. सेझ हे जागतिकीकरणाच्या नवीन आर्थिक नीतीचे अपत्य आहे. नैतिकतेचे विघातक रूपाचे दर्शन म्हणजे सेझ होय. आर्थिक उदारीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या नावाखाली या देशातील शेतकऱ्याला उद्ध्वस्त करून भांडवलदारी संस्कृती सिमेंटची जंगले, सिमेंटची संस्कृती निर्माण करून येथील नैसर्गिक जीवन संपविण्याचा प्रयत्न करत आहे. केवळ मूठभर भांडवलदार, व्यापारी यांच्या भल्यासाठी सेझ प्रकल्पातून आजपर्यंत जतन केलेली, वाढवलेली कृषिसंस्कृती, गावगाडा, आदिवासी समाज आणि इतर जाती–जमाती कायमच्या नष्ट होत आहेत. यातूनच शेतकरी, बलुतेदार, मजूर यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आक्राळ–विक्राळ रूप धारण करून उभा आहे. साहित्यात समाज वास्तवचं प्रतिबिंब पडत असते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'सेझ' कादंबरी होय.

जागतिकीकरणाचा हेतू सफल करण्यासाठी शासन मोठमोठ्या कंपन्यांना बिल्डर्स यांना हाताशी धरून शेतकऱ्यांना आमिषे दाखवून त्याला रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. 'विशेष आर्थिक क्षेत्राच्या' प्रकल्पासाठी शेतकऱ्याच्या जमिनी नगण्य किंमतीत घेऊन शोषण आणि भूमिहीन करून टाकत आहे. या कादंबरीत अनेक सामाजिक प्रश्न लेखकाने उपस्थित केले आहेत. इथला शेतकरी एसईझेड पूर्वी सधन नव्हे तर समाधानी जीवन जगत होता. तिथला निसर्ग, ग्रामसंस्कृती, कृषिसंस्कृती किती महत्त्वपूर्ण आहे. लोकजीवन, राहणीमान, सण, उत्सव, यामुळे वेढलेली ही संस्कृती पिढ्यानपिढ्या कशी समरस झाली आहे. छोटेमोठे शेतकी व्यवसाय, पोल्ट्री, दूधदुभते, शेतमाल, भाजीपाला, गाई–म्हशी, शेळ्या–मेंढ्या–बकऱ्या इ. मुळे तेथील संस्कृती कशी गुण्यागोविंद्याने नांदत होती. तिथल्या निसर्गाशी, मातीशी आणि संस्कृतीशी असलेले ऋणानुबंध याचे समर्पक वर्णन केले आहे. या साऱ्यांचा ऱ्हास झाल्याचे अधोरेखित करून उद्ध्वस्त जीवनाचे भयानक चित्र उभे केले आहे.

'विशेष आर्थिक क्षेत्र' प्रकल्पामुळे नष्ट होऊ घातलेल्या स्थानिक कृषिसंस्कृतीची कहाणी आहे. तिला शेतकऱ्याच्या जीवनाची आणि खेड्याची आत्मकहाणी म्हणता येईल. रायगड जिल्ह्यातील एका खेड्यात अचानक 'एसईझेडी' ची बातमी येते आणि सारे गाव हादरते. 'अलायन' नावाची कंपनी गावातील जमिनी विकत घेऊन त्याठिकाणी मोठा उद्योग उभारणार असल्याची ती बातमी शेतकऱ्यांना पहिल्यांदा आनंददायक वाटते. पण नेमके काय होणार याची त्यांना कल्पना नाही. पण पडीक जमिनीला भाव येईल एवढी मात्र कल्पना मनात येते. पण जगातील घडामोडीची या खेडुतांना कल्पना नव्हती. ती त्या गावातील गजानन गुरुजींकडून समजते. गजानन गुरुजी गावाला एकत्र करून वस्तुस्थितीची माहिती देतात. तेव्हा गाव हादरते. पण त्याच वेळी गावातील वातावरण बिघडते. कारण गावात कंपनीला, शासनाला मदत करणारे हस्तक असतात. नोकरदारांच्या दृष्टीने चांगली संधी आहे तर शेतकऱ्याच्यादृष्टीने भूमिहीन होण्याची वेळ येणार यामुळे गावातील वातावरण दूषित होते.

गावातील बरीचशी लोक कामधंद्याच्या निमित्ताने मुंबईला असतात. मात्र सण, उत्सव आणि सुगीच्या निमित्ताने एकत्र येतात. त्यांचा एकमेकावर विश्वास होता. पण 'एसईझेड' मुळे एकमेकांकडे अविश्वासाने पाहू लागले. त्यातच परिस्थितीची जाणीव नसलेले नोकरदार मुंबईकर गावातील माणसांवर जमिनी विकण्यासाठी दबाव टाकू लागतात. त्यामुळे घरात अंतर्गत वाद होऊ लागले. मात्र सर्व वस्तुस्थितीचा आणि विपरीत परिणामाचा उलगडा होताच गाव एक दिलाने 'एसईझेड'च्या विरोधात उभे राहिले आंदोलन मोर्चे सुरू झाले. 'सेझ' विषयी रामचंद्र काळुंखे लिहितात. ''एकीकडे कोकणात गावेच्या गावे हुसकावून लावली जात असताना उभा राहणारा व्यापक लढा वाचक वर्तमानपत्रांतून वाचत होता आणि त्याच वेळी या विषयावर जणू लढ्याचाच इतिहास लिहिला जावा अशा स्वरूपाची कादंबरी प्रसिध्द झाली. समकालीन वर्तमान तातडीने पकडण्याचे मोठे धाडस या कादंबरीत दिसून येते.''3 यावरून लेखकाची संवेदनशीलता, तळमळ, आत्मीयता आणि समाज वास्तव यांचे दर्शन घडते.

'सेझ'मध्ये नीतीमूल्यांचा ऱ्हास प्रखरतेने व्यक्त केला आहे. स्वातंत्र्यानंतर लोकशाही व्यवस्था स्थापन झाली. पण प्रत्यक्षात हुकूमशाही कशी रूजत आहे. याचे भेदक चित्र उभे केले आहे. शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे जमिनी विकत घेतल्या जाणार नाहीत, असे आश्वासन सरकार देते. पण पडद्याआड वेगळ्याच घटनाा घडत असतात. शेतकऱ्यांना आश्वासन देऊन बेसावध करण्यात आले आणि दुसरीकडे त्या खाजगी कंपनीला आवश्यक जमीन अधिग्रहित करण्यासाठी परवानगी देण्यात आली. त्यानंतरची या कादंबरीत शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा संघर्ष अभिव्यक्त करते. एसईझेड म्हणजे हे या शेतकऱ्यांना कळले नसेलही. पण पुढच्या पिढीला भूमिहीन करण्याची जाणीव झाल्याचे दिसते. याने शेतकऱ्याची घालमेल होत आहे.

कोणताही प्रकल्प वाईट असेल असे नाही. पण प्रकल्पाची अमंलबजावणी ही वैचारिक, विचारशील पातळीवर होत नसल्यामुळे त्याचे विपरीत परिणाम होतात. याचा पहिला प्रहार कृषिजीवनावर होताना दिसतो. 'विशेष आर्थिक क्षेत्र' हा प्रकल्प देशात सुरू केला आणि

कृषिजीवन उद्ध्वस्त होऊ लागले. सेझसाठी विशिष्ट भागातील जमिनी शासनाच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात ताब्यात घ्यायच्या आणि त्या शेतजमिनीवर मोठे उद्योग उभे करायचे, असा प्रयत्न मूठभर व्यापारी, भांडवलदारांनी सुरू केला आहे. शेती क्षेत्रापेक्षा उद्योगाच्या उभारणीने त्या जमिनीची उत्पादकता वाढेल, नोकरी मिळेल अशा गोष्टी मनावर बिंबविल्या. यासाठी नापीक जमिनीचा उपयोग केला तर काही हरकत नाही. परंतु चांगल्या पिकावू शेतजमिनी सेझसाठी ताब्यात घेण्याचा आणि तेथील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. शेतकऱ्यांची वाताहत कशी होत आहे याची कहाणी सेझ या कादंबरीत लेखकाने मांडली आहे.

प्रवीण बांदेकर यांनी 'चाळेगत' मध्ये कोकणमधील शेतकरी आणि समुद्रकिनारी मासेमारी करणाऱ्या लोकांच्या जगण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. परकीय देशातील विविध कंपन्या येतात. भांडवलदार आणि राजकारणी मंडळी लोकांना 'पर्यटन व्यवसाया'चे त्याच्या फायद्याचे वर्णन करतात. लोक त्यांच्याकडे आकर्षित होतात. नोकरदार लोक आपल्या जमीनी नगण्य किंमतीत देतात. परंतु त्याची झळ तेथील वास्तव्यास असणाऱ्या शेतकऱ्याला बसते. हे मुळातच दारिद्र्यात आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात. थोड्याशा शेतीवर मच्छमारीवर, आंबा, नारळीवर आपला उदरनिर्वाह करत असतात. परंतु राजकीय आणि शासकीय पातळीवर दबावाचे षडयंत्र रचून, त्यांनी आंदोलने केली तरी त्यांच्यावर जबरदस्त हल्ला करून जखमी केले जाते. कित्येकांचा त्यात बळी जातो. प्रदूषणामुळे जमीनीचा पोत कमी होऊन नापीक बनते. एकंदर कृषिजीवन नष्ट होत असल्याचे घोषित केले आहे. भविष्यात भारतातील कृषिजीवन नामशेष होईल काय? असा प्रश्न उभा राहतो. कृषिजीवनाच्या ओहोटीचे अत्यंत सूक्ष्म आणि तळमळीने चित्र रेखाटले आहे.

1 मराठी गामीण कादंबरी—ठाकूर रवींद्र, स्नेहवर्धन प्रकाशन, प्र. आ. 1993 द्वि. आ. 2001 शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर पृ.174)
2 इंगोले कृष्णा, चंदनशिव भास्कर —डॉ. द. ता. भोसले गौरव ग्रंथ ग्रामीण साहित्य आणि वास्तव पृ.115 प्रकाशन स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्र. आ.26 जाने. 2011
3 काळुंखे रामराचंद्र—ग्रामीण कादंबरीःआकलन आणि विश्लेषण, कैलास पब्लिकेशन्स, प्र. आ. 2013 पृ. 272 )
4 मुलाटे वासुदेव—विषवृक्षाच्या मुळ्या, स्वरूप प्रकाशन औरंगबाद, प्रथमावृत्ती 1989, तृतीय आ. 2003
5 पाटील विश्वास—झाडाझडती, राजहसं प्रकाशन, पुणे, अठरावी आ. 2012,
6 पाटील विश्वास—पांगिरा, राजहसं प्रकाशन, पुणे अकरावी आ. 2011
7 देशमुख सदानंद—बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. 2002, सातवी आ. 2007,
8 बाराडे रा. रं.—रिक्त अतिरिक्त, साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2009
9 सखाराम शंकर—सेझ, 2007
10 बांदेकर प्रवीण—चाळेगत, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथमावृत्ती ऑक्टों. 2009



*प्रा. सुलोचना बापूराव नरुटे*
*मु. वाघमोडेवाडी पो. गोंदवले बुद्रुक , ता. माण जि. सातारा.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org